# समिती दर्पण

मार्च २०२५

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात सात आणि नगरमध्ये एक अशी आठ वसतिगृहे आहेत. त्यात सुमारे ११०० विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# स्पर्धा इतरांशी नको, स्वतःशीच करा

## शेखर गायकवाड यांचा सल्ला, विविध स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिके प्रदान

"जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात काम करताना कधीही इतरांशी तुलना करू नका आणि कोणाशी स्पर्धा करू नका. स्पर्धा करायचीच असेल, तर ती स्वतःशीच करा. त्यातून तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी साह्य मिळेल," असा सल्ला 'यशदा'चे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड यांनी दिला.

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विद्यार्थी विकास केंद्रातर्फे आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, विद्यार्थी विकास केंद्राचे अध्यक्ष प्रभाकर पाटील, कार्यवाह सीमा होस्कोटे, पर्यवेक्षिका सविता भुक्ते आदी उपस्थित होते. विद्यार्थी विकास केंद्रातर्फे वर्षभर घेतल्या जाणाऱ्या वादविवाद, वक्तृत्व, सादरीकरण, पाककला तसेच सांघिक व वैयक्तिक क्रीडा स्पर्धांतील विजेत्यांना यावेळी श्री. गायकवाड यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

पाहुण्यांचा परिचय विद्यार्थिनी स्नेहल कुलकर्णी हिने करून दिला. श्री. रंजनकर यांनी स्वागत केले. अनुष्का राऊत हिने आभार मानले. जीवन बोधले याने सूत्रसंचालन केले.



"स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे, यश मिळवावे; पण स्पर्धेपलीकडे जाणे गरजेचे आहे. संतुलित आणि समतोल विचार महत्त्वाचा आहे. तो अंगिकारा. माहितीपेक्षा ज्ञान मिळवा. तुमच्यातील ऊर्जा, चैतन्य, कल्पकता आणि वेगळेपणाची समाजाला गरज आहे. ते सामर्थ्य प्राप्त करा.

- **शेखर गायकवाड,** अतिरिक्त महासंचालक, 'यशदा'

"विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, स्वयंशिस्त निर्माण व्हावी, तसेच त्यांच्यातील ऊर्जेला, कल्पकतेला, कौशल्याला वाव मिळावा, यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते.

- **सीमा होस्कोटे,** कार्यवाह, विद्यार्थी विकास केंद्र

## 'आयएसओ' मानांकनात समितीचे सातत्य कायम

विद्यार्थी साहाय्यक समितीने वसतिगृह व्यवस्थापनासाठी तीन वर्षांपूर्वी 'आयएसओ' गुणवत्ता प्रणाली लागू केली. विद्यार्थ्यांच्या प्रवेशापासून त्यांच्या क्लियरन्सपर्यंत या प्रणालीप्रमाणे कार्यवाही सुरू केली. याचे सातत्याने ऑडिट होत असून त्यात सुधारणाही होत आहे. आनंदाची गोष्ट म्हणजे पुढील तीन वर्षांसाठी याचे नूतनीकरण झाले आहे. सर्व कार्यकर्ते, कर्मचारी यांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे फलित आहे.

समितीने ISO 9001:2015 ऑडिट यशस्वीरित्या पूर्ण केले. ग्रामीण भागातून उच्च शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास व भोजनाच्या सुविधांसह त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समिती सातत्याने प्रयत्नशील असते. समितीच्या कामकाजाची गुणवत्ता, उत्कृष्टता आणि सतत केल्या जात असलेल्या सुधारणा या निकषांच्या आधारे हे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. विश्वस्त, कार्यकर्ते, कर्मचारी यांनी समर्पित वृत्तीने केलेल्या कामामुळे हे यश प्राप्त झाले आहे.


ICV

Certificate of Registration

This is to certify that the Management System of

VIDYARTHI SAHAYYAK SAMITI
(VASATIGRUHA VYAVASTHAPAN)

HO & SITE 1 : DR.ACHYUT S APTE VASATIGRUH,1182/1/4, SHIVAJI NAGAR, F.C ROAD, PUNE : 411005, MAHARASHTRA, INDIA.

SITE2 : LALA LAJPATRAI VIDYARTHI BHAVAN, 103/A,SENAPATI BAPAT ROAD, PUNE : 411016, MAHARASHTRA, INDIA.

SITE 3 : SUMITRA SADAN VASATIGRUH, 1137/13, MODEL COLONY, SHIVAJI NAGAR, PUNE 411016, MAHARASHTRA, INDIA.

has been audited by ICV and found to be in compliance with the requirements of the standard

ISO 9001:2015
(Quality Management Systems)

This certificate is valid for the following scope:

PROVISION OF ACCOMMODATION, FOOD, AND ENSURING OF OVERALL DEVELOPMENT OF THE STUDENTS FROM ECONOMICALLY WEAKER SECTION, HAVING RURAL BACKGROUND TO COMPLETE THEIR HIGHER EDUCATION.

| | |
|---|---|
| Certificate No. | :IN/94717154/9746 |
| Certificate Issue Date | :10/03/2025 |
| 1st Surveillance Due Date | :10/02/2026 |
| 2nd Surveillance Due Date | :10/02/2027 |
| Date of Expiry | :07/03/2028 |

IAF

EGAC Accredited



## मिळाली संस्कारांची शिदोरी, घेऊ उंच भरारी

### समितीचा निरोप घेताना विद्यार्थ्यांची हृद्य भावना

विद्यार्थी साहाय्यक समितीत विश्वस्त, कार्यकर्ते, पर्यवेक्षकांकडून मिळालेले संस्कार, विविध उपक्रमांमुळे झालेला सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास, समितीतील दिनक्रमामुळे लागलेली शिस्त या शिदोरीच्या बळावर आता बाहेरच्या जगात प्रवेश करताना उंच भरारी घेऊ, असा आत्मविश्वास समिती वसतिगृहात राहणाऱ्या अखेरच्या वर्षाच्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

निमित्त होते निरोप समारंभाचे. मुलींच्या नवीन वसतिगृहात झालेल्या या कार्यक्रमात समितीचा निरोप घेताना विद्यार्थ्यांचे अंतःकरण जड झाले होते, मात्र त्याच बरोबर पदवीधर होऊन बाहेर पडताना आता आपण नक्की यशस्वी होऊ, ही उमेद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती.

समितीला आपली आठवण राहावी, यासाठी विद्यार्थ्यांनी भेटवस्तू दिल्या. लजपत भवन वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी अडीच हजार रुपयांची पुस्तके व २१ रोपे दिली.

या कार्यक्रमाला समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, वसतिगृह उपसमितीचे अध्यक्ष दिनकर वैद्य, विद्यार्थी विकास केंद्राच्या कार्यवाह सौ. सीमा होस्कोटे, समितीचे कार्यकर्ते हरीश अष्टेकर तसेच अन्य पदाधिकारी, पर्यवेक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात सुरुवातीला विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले. यंदा प्लेसमेंट मिळालेल्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेली चित्रफीत सादर करण्यात आली, ज्यात समितीची शिस्त, नियम, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि दैनंदिन जीवन या गोष्टी प्रभावीपणे मांडण्यात आल्या होत्या.

समितीच्या विविध योजनांचा लाभ कसा झाला, याबाबत विद्यार्थ्यांनी भावना व्यक्त केल्या. कमवा- शिका योजना आणि पाल्य- पालक योजनेमुळे मोठा आधार मिळाल्याचे अनेक विद्यार्थ्यांनी सांगितले. मनोगत व्यक्त करताना अनेक विद्यार्थी भावुक झाले. त्यांनी समिती वास्तव्यातील आठवणींना उजाळा दिला.

"तुम्ही समितीमधून बाहेर पडत असलात तरी माजी विद्यार्थी म्हणून समितीची दारे तुमच्यासाठी कायम उघडी आहेत," असे श्री. रंजनकर यांनी सांगितले. श्री. वैद्य यांनी समितीच्या कार्यपद्धतीविषयी माहिती देत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक सौ. संगीता गारवे यांनी केले, सूत्रसंचालन पर्णवी मस्के यांनी, तर आभार प्रदर्शन आदित्य झेंडे यांनी केले.

## भारतीताईंचे व्यक्तिमत्त्व शांत तेवणाऱ्या समईसारखे

### श्रद्धांजली सभेत विविध संस्थांच्या प्रतिनिधींची भावना



'भारतीताईंचे व्यक्तिमत्त्व हे शांतपणे तेवणाऱ्या समईसारखे होते. त्यांची प्रसन्नता, पाठबळ तसेच कौटुंबिक जबाबदाऱ्या त्यांनी आनंदाने पेलल्यामुळेच श्री. प्रतापराव पवार मोठे सामाजिक काम उभे करू शकले. बालकल्याण केंद्राच्या कामात त्यांचा सक्रिय सहभाग होताच, पण श्री. प्रतापराव ज्या ज्या संस्थांवर काम करत आहेत, त्या सर्व संस्थांच्या पाठिशी त्या प्रत्यक्ष- अप्रत्यक्षरित्या उभ्या होत्या,' अशी भावना विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी श्रद्धांजली सभेत व्यक्त केली.

स्वतः उत्तम चित्रकार असणाऱ्या भारतीताई पतीच्या व्यक्तिमत्त्वाशी, त्यांच्या कार्याशी एकरुप झाल्या होत्या. भारतीताईंच्या स्मृती कायमस्वरुपी जतन करण्यासाठी एखादा उपक्रम राबवावा, अशी इच्छाही यावेळी व्यक्त केली गेली.

विद्यार्थी साहाय्यक समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या पत्नी, बालकल्याण केंद्राच्या विश्वस्त भारती पवार यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी विविध संस्थांच्या वतीने २८ मार्च रोजी समितीच्या डॉ. आपटे वसतिगृहातील मोडक सभागृहात सभा झाली. यावेळी समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, कार्यकर्त्या सुप्रिया केळवकर, मराठवाडा मित्रमंडळाचे कार्याध्यक्ष भाऊसाहेब जाधव, बालकल्याण केंद्राचे आनंद थत्ते, वनस्थळी संस्थेच्या भारती भिडे, समितीचे कायम विश्वस्त तुकाराम गायकवाड, मुख्य विकास अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, खजिनदार संजय अमृते, प्रख्यात वकील शिवराज कदम, स्व- रुपवर्धिनीचे शिरीष पटवर्धन यांनी भारतीताईंच्या स्मृतींना उजाळा देत आदरांजली अर्पण केली.

व्यवसाय आणि सामाजिक कामामुळे कुटुंबाला फारसा वेळ देता आला नाही, मात्र ५५ वर्षांच्या सहजीवनात तिने कोणतीही मागणी केली नाही, कायम माझ्या पाठिशी उभी राहिली, अशा शब्दांत प्रतापराव पवार यांनी भारतीताईंविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या.

श्रुती साने यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# समिती संस्कारांचे मूल्य जाणणारा व्यावसायिक मूल्यमापनकर्ता

तयाचा वेलू...



"A professional valuer who values VSS," असे ज्यांचे वर्णन करता येईल, असे श्री. जगदीश गडकरी. मूल्यांकन कसं करतात, ह्याचं इत्यंभूत ज्ञान त्यांना आहे. त्यामुळे समितीचं त्यांच्या आयुष्यातील महत्त्व ते पूर्णपणे विषद करू शकतात पण त्याची मोजदाद मात्र करू शकत नाहीत..!

जगदीश गडकरी यांचं कुटुंब नाशिकजवळच्या ओझर इथलं. वडील भारतीय सेनेत होते. १९६१ आणि ६५ च्या युद्धात त्यांनी भाग घेतला होता. नंतर त्यांनी हिंदुस्तान एरोनॉटिक्समध्ये नोकरी केली. तिथल्याच शाळेत जगदीशजींचं बारावीपर्यंतचं शिक्षण झालं. बारावीनंतर त्यांना पुण्यात इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये (COEP) प्रवेश मिळाला, पण मुख्य मुद्दा होता पुण्यात राहण्याच्या खर्चाचा.

वडील सामाजिक कार्याशी बांधले गेलेले असल्यामुळे त्यांना विद्यार्थी साहाय्यक समितीची माहिती मिळाली. गुणवत्तेच्या जोरावर जगदीश यांना लगेचच समितीत प्रवेश मिळाला.

पहिले काही दिवस नक्कीच अवघड गेले... बोलता बोलता त्यांनी भारतीय कुटुंबातलं मोठं सत्य सांगितलं. हुशार मुलांना घरात खूप महत्त्व असतं. अभ्यास करतोय ना, मग सगळ्या गोष्टी हातात मिळतात. स्वतःची सुद्धा फारशी कामं करायला लागत नाहीत. पण समितीत आल्यावर हे चित्र पारच बदललं! अगदी टॉयलेट साफ करण्यापासून सगळी कामं स्वतः करायची, हे पचवणं नक्कीच अवघड गेलं असणार. पण सकारात्मक वृत्ती माणसाला सगळ्यांतून तारून नेते. ते म्हणाले, "मी एकटा थोडाच होतो ही सगळी कामं करायला लागणारा? सगळ्यांनाच करायचं होतं. मग ती टॉयलेट्स सफाई असो, स्वतःची खोली साफ ठेवणं, चादरी, उशा नीटनेटक्या ठेवणं, वापरणं, जवळच्या वस्तीमधल्या शालेय मुलांना शिकवणं, सायकल मारत कॉलेजला जाणं, मेसमध्ये जेवणं, सकाळी उठून योगासनं करणं... सगळ्यांसाठी नियम तेच होते आणि त्या दिवसांत या सगळ्या गोष्टी इतक्या अंगवळणी पडल्या की अजूनही त्या केल्या जातात."

मी त्यांना विचारलं, की हॉस्टेलमधून बाहेर पडल्यावर, सुटलो बाबा त्या सकाळच्या योगासनांच्या कटकटीतून.. असं तुम्हाला कधी वाटलं नाही का?

त्यावर ते म्हणाले, "मी तर अजूनही योगासने करतोच, पण माझ्याकडे बघून बघून माझी पत्नी आणि मुलं पण करायला लागली आणि त्यांनाही त्याचे फायदे दिसायला लागले."

जगदीश गडकरी हे Practicing Valuers Association चे मेंबर आहेतच, पण चेअरमनही होते. या असोसिएशनतर्फे yoga week साजरा केला जातो. त्या दरम्यान ते आणि त्यांच्या पत्नी आजही सूर्यनमस्कार घालतात.



अच्युतराव आपटे, माधुरीताई पुरंदरे, तांबोळी सर यांची त्यांनी अतिशय आत्मीयतेने आठवण काढली. समितीमधील विविध उपक्रमांचा त्यांनी किती खोलवर विचार केला होता, याविषयी तर ते बोललेच पण रेक्टर कडक असण्याच्या फायद्यांविषयी सुद्धा बोलले.

पाल्य- पालक योजनेत पालकांना भेटून आल्यावर साधारण काय बोलणं झालं, ह्याचा संक्षिप्त रिपोर्ट द्यावा लागायचा. त्यामुळे जे बोलणं झालं असेल, त्याची उजळणी व्हायची, डोक्यात ते मुद्दे ठसायचे, असं त्यांचं विशेष निरीक्षण होतं. विद्यार्थ्याला उपयोग होईल, असेच पालक निवडले जायचे. ते म्हणाले, माझे पालक construction च्या व्यवसायात होते, त्यामुळे मी त्यांच्याशी माझ्या अभ्यासातल्या अडचणींबद्दल बोलू शकायचो.

जगदीश सर सिव्हिल इंजिनियर झाले. काही दिवस त्यांनी पुण्यात नोकरी केली. मग नाशिकमध्ये स्थायिक झाले. पत्नीबरोबर स्वतःचा consultancyचा व्यवसाय चालू केला. त्यांच्या पत्नी कांचन गडकरी ह्याही त्याच कॉलेजच्या इंजिनियर. आधी structural ..design.. planning...coordinating अशी सुरुवात करून आता मुख्य व्यवसाय property valuation संबंधी आहे.

विविध बँका आणि financial institutions च्या valuation पॅनलवर ते आहेतच पण त्या व्यतिरिक्त Association of Civil Engineers, Indian Council of Arbitrators, International Valuation Standards Council अशा विविध संस्थांशी संलग्न आहेत. वीसेक देशात कामानिमित्ताने त्यांचा प्रवास झाला आहे, lectures, presentations केलेली आहेत. Valuers Association चे National President म्हणून काम केलेलं आहे. त्या दरम्यान सिंगापूर, मलेशिया, रशिया, अझरबैजान या देशांशी knowledge exchange साठी सामंजस्य करार (MOU) केले आहेत. एवढे MOU करणारे ते बहुधा पहिलेच प्रेसिडेंट असावेत.


समितीसाठी आपल्याला काय करता येईल, ह्या विचारातून त्यांनी आपल्या स्वतःच्या जागेत समितीचं नाशिक सेंटर चालू केलं होतं. पण कदाचित ती वेळ योग्य नव्हती आणि त्यामुळे ते हळूहळू बंद पडलं. आता मात्र त्या दृष्टीने त्यांचे परत प्रयत्न सुरू आहेत. अजूनही त्यांना नवीन गोष्टी शिकण्याची ओढ आहे. समृद्धी मार्गावरच्या सगळ्यात मोठ्या बोगद्याचा अभ्यास करण्यासाठी ते नुकतेच जाऊन आले. ते म्हणाले, "वेळ काढायचा ठरवला की मिळतोच. एखाद्या गोष्टीचं तुम्हाला तेवढं महत्व वाटलं पाहिजे आणि अर्थातच समिती तशीच गोष्ट आहे."

जगदीशजींची दोन्ही मुलं उत्तम शिक्षण घेत आहेत. मुलगा IIT तून enginner झाला आहे आणि आता मिलानमध्ये environmental engineering मध्ये पुढचं शिक्षण घेतो आहे. मुलगी Dentist होते आहे.

(शब्दांकन- माधवी कुलकर्णी)

समिती वृत्त

## चित्रकला स्पर्धेत देवयानीचे यश



समितीच्या सुमित्रा सदन वसतिगृहातील विद्यार्थिनी देवयानी कांतीलाल सोनवणे हिने काढलेल्या चित्राला नॅशनल आर्ट अँड ड्रॉइंग कॉम्पिटिशनमध्ये प्रथम पारितोषिक मिळाले. देवयानी ही भारती विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ फाईन आर्टमध्ये प्रथम वर्षात शिकत आहे.

## माहेश्वरी गिरडे हिला 'महाराष्ट्ररत्न'



समितीच्या डॉ. आपटे वसतिगृहातील विद्यार्थिनी माहेश्वरी गिरडे हिला महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. साऊ ज्योती फाउंडेशनच्या वतीने दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराचे वितरण पुण्यात भारत इतिहास संशोधक मंडळाच्या सभागृहात २३ मार्च रोजी झालेल्या कार्यक्रमात करण्यात आले. सामाजिक, महिला सक्षमीकरण, ग्रामीण विकास या क्षेत्रात केलेल्या कामाची दखल घेऊन माहेश्वरी हिला हा पुरस्कार सहाय्यक पोलीस आयुक्त प्रिया थोरात (क्राईम ब्रांच, मुंबई) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी रामजीत गुप्ता (चीफ इन्व्हेस्टिगेशन ऑफीसर, मुंबई), आम्रपाली पारवे (विद्रोही कवी), चित्रा दीक्षित (अभिनेत्री) आदी उपस्थित होते.

## भारती दाते 'पुरवठा निरीक्षक'



समितीची माजी विद्यार्थिनी भारती फक्कड दाते हिची महाराष्ट्र राज्य अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामध्ये पुरवठा निरीक्षक (FSI) म्हणून निवड झाली आहे. एमपीएससी परीक्षेत यश मिळाल्यानंतर भारती हिने या पदाला गवसणी घातली आहे.

## उलगडला बाबूजींचा जीवनपट

### 'स्वरगंधर्व'चे प्रदर्शन, चित्रपटाच्या लेखक- दिग्दर्शकांशी संवाद

संगीताच्या क्षेत्रात बाबूजी अर्थात सुधीर फडके यांचे नाव अजरामर आहे. त्यांच्या गीतरामायणाचे गारुड मराठी मनावर गेल्या ७० वर्षांपासून आहे. अशा या बाबूजींचा जीवनपट समितीच्या विद्यार्थ्यांसमोर उलगडला आणि मोठा कलाकार होण्यासाठी किती जिद्द, चिकाटी, हालअपेष्टा सोसण्याची तयारी आणि संयम लागतो, याचा प्रत्यय त्यांना आला.

निमित्त होते 'स्वरगंधर्व' या चित्रपटाच्या प्रदर्शनाचे. मुलींच्या नवीन वसतिगृहाच्या योगा हॉलमध्ये ६ मार्च रोजी झालेल्या विशेष कार्यक्रमात हा चित्रपट दाखविण्यात आला. त्याचबरोबर चित्रपटाचे लेखक- दिग्दर्शक योगेश देशपांडे आणि चित्रपटात आशा भोसले यांची भूमिका साकारलेल्या अभिनेत्री अपूर्वा मोडक यांच्या संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. या कार्यक्रमाला समितीच्या सर्व वसतिगृहांतील विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. समितीचे कार्यकर्तेही उपस्थित होते. चित्रपट प्रदर्शनानंतर श्री. योगेश देशपांडे यांनी चित्रपट निर्मितीबाबतचे आपले अनुभव सांगितले. चित्रपट तयार करताना केलेला अभ्यास, मेहनत, आलेल्या अडचणी याविषयी चर्चा केली. अपूर्वा मोडक यांनी आपला अभिनय प्रवास आणि स्वरगंधर्व चित्रपटातील भूमिकेबद्दल सांगितले. दोघांनीही विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. त्यांच्या मनातील चित्रपट क्षेत्राविषयीच्या शंकांचे निरसन केले.





ऋषिकेश आभाळे



सागर नळकांडे

## ऋषिकेश, सागर यांची न्यायाधीशपदी नियुक्ती

समितीचे माजी विद्यार्थी ऋषिकेश आभाळे आणि सागर नळकांडे यांची न्यायाधीशपदी नियुक्ती झाली आहे. हे दोघेही कायदा शाखेचे विद्यार्थी असून एमपीएससी अंतर्गत त्यांची ही नियुक्ती झाली आहे.

## 'एक्स्पो'मध्ये स्टॉल

मराठा उद्योजकता संघाच्या (MEA- Maratha Entrepreneur Association) वतीने आयोजित 'एक्स्पो'मध्ये विद्यार्थी साहाय्यक समितीच्या माहिती प्रसारणासाठी स्टॉल उभारण्यात आला होता. ता. १ व २ मार्च रोजी कर्वेनगर येथील महालक्ष्मी लॉन्स येथे दोन दिवस चाललेल्या या 'एक्स्पो'मध्ये प्रसिद्ध सरकारी वकील उज्वल निकम, भीमथडी जत्रेच्या संस्थापिका सुनंदा पवार, पिंपरी चिंचवडचे पोलीस उपायुक्त शिवाजी पवार, पोलीस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे, प्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी समितीच्या स्टॉलला भेट देऊन समितीच्या कामकाजाची माहिती घेतली.



## नगरच्या वसतिगृहात महिला दिन साजरा

विद्यार्थी विकास केंद्रातर्फे समितीच्या नगर येथील मधुभाऊ चौधरी वसतिगृहात ८ मार्च रोजी महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचा आयोजन करण्यात आले होते.

यावेळी 'माझ्या मनातील स्त्रीचे स्थान' या विषयावर गटचर्चा झाली. या कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन वसतिगृहातील विद्यार्थिनींनी केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदापासून आभार प्रदर्शनापर्यंत सर्व भूमिका मुलींनी उत्कृष्टपणे पार पाडल्या. समितीच्या कार्यकर्त्या सौ. सुनीता झिंजाड व कार्यकर्ते रवींद्र देशपांडे व पर्यवेक्षिका सौ. विद्या सूर्यवंशी यांनी मुलींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भक्ती परदेशी ही विद्यार्थिनी होती. प्रमुख पाहुण्या म्हणून अनुष्का घाडगे व शुभांगी बडे उपस्थित होत्या. प्रास्ताविक कार्तिकी आहेर हिने केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय ईशा पंडित, श्रद्धा निक्रड व चंचल गुंजाळ यांनी करून दिला. पाहुण्यांचे स्वागत समीक्षा आहेर, श्रावणी बानकर, समृद्धी निमसे व प्रिया उकिर्डे यांनी केले. सूत्रसंचालन भक्ती पवार व समीक्षा पवार यांनी केले. आभार समृद्धी जासूद हिने मानले.

## एसपीके फार्म्सला भेट



समितीच्या उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने नाशिक व शिर्डी येथील एसपीके फार्म येथे शैक्षणिक दौऱ्याचे आयोजन केले होते. त्यात विद्यार्थ्यांना शाश्वत आणि नैसर्गिक शेतीचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाले. ग्रामीण भागातून आलेल्या या विद्यार्थ्यांना शून्य बजेट नैसर्गिक शेती या फायदेशीर आणि पर्यावरणपूरक संकल्पनेची माहिती मिळाली.

पद्मश्री सुभाष पाळेकर यांनी विकसित केलेली एसपीके शेती ही स्वयंपूर्ण व शाश्वत शेतीची पद्धत असून, नैसर्गिक घटकांचा उपयोग करून शेतीचा उत्पादन खर्च कमी करणे आणि उत्पादनाची गुणवत्ता वाढवणे, हे याचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

या दौऱ्यात विद्यार्थ्यांना श्री. पाळेकर यांनी मार्गदर्शन केले. नैसर्गिक शेतीतील विविध तंत्रे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवली. तसेच देशभरातील अनुभवी शेतकऱ्यांशी संवाद साधला.

### समितीत प्रायोगिक शेती प्रकल्प

दौऱ्यातील अनुभवातून प्रेरित होऊन मुलांनी पुण्यातील समितीच्या नव्या संकुलात प्रायोगिक शेती प्रकल्प हाती घेतला. लजपत भवनच्या मागे एक गुंठा जागेवर हा प्रकल्प सुरू केला आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी समितीकडून आवश्यक सोयी- सुविधा पुरवण्यात आल्या आहेत. या प्रकल्पाचे नेतृत्व रुद्राणी मोहिते, साक्षी सुर्वे, कल्याणी पोटे, रोहिणी गायकवाड, खुशी सनासे, गीतांजली चोळे आणि भक्ती बोडखे या विद्यार्थिनी करत आहेत. त्यांना डॉ. ज्योती गोगटे, हेमंत राजहंस, माधुरी देशपांडे आणि अनुभवी शेतकरी गुलाब घुले मार्गदर्शन करत आहेत.